लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यात माहे जुलै ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत अतिवृष्टी व पूर यामुळे झालेल्या शेत जमीनीच्या नुकसानीसाठी मदत देण्याबाबत.
(रु. १३,३१,२५०)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीएलएस-२०१९/प्र.क्र.११३/म-३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:-०९.०७.२०१९

वाचा :

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांकः सीएलएस-५९८३/ २४८३६१/ प्र.क्र.८२०/ म-३, दिनांक ३१ जानेवारी,१९८३
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांकः सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दि.१३ मे,२०१५

प्रस्तावना :

लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यात माहे जुलै ते ऑक्टोंबर, २०१६ या कालावधीत अतिवृष्टी व पूर परिस्थिती यामुळे शेतजमीनीचे नुकसान झाले आहे. सदर कालावधीत लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यात शेतजमीन अतिवृष्टीमुळे वाहून/खरडून गेलेली आहे. महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ठरविण्यात आलेल्या SDRF च्या निकषानुसार मदत देण्यासंदर्भात दिनांक २८ जून २०१९रोजी झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यात माहे जुलै ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत अतिवृष्टी व पूर परिस्थिती यामुळे शेतजमीनीचे नुकसान झाले आहे. सदर कालावधीत लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यात शेतजमीन अतिवृष्टीमुळे वाहून/खरडून गेलेली आहे. सदर आपत्तीत शेत जमीनीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना खालीलप्रमाणे मदत देण्याकरीता रु. १३,३१,२५०/- (रु. तेरा लक्ष एकतीस हजार दोनशे पन्नास फक्त) वितरित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

जिल्हा/तालुका	मंडळाचे नाव	एकूण बाधित शेतकऱ्यांची संख्या	शेतजमिन खरडून/वाहून गेल्यामुळे बाधित झालेले	
			बाधित क्षेत्र (हेक्टर)	आवश्यक निधी (रु. ३७५०० प्रति हेक्टर)
लातूर/ रेणापूर	रेणापूर	५४	९.०५	३३९३७५
	पोहरेगांव	१२७	१६.३०	६११२५०
	कारेपूर	२०	९.९५	३७३१२५
	पानगांव	०१	०.२०	७५००
	एकूण	**२०२**	**३५.५०**	**१३,३१,२५०**

शेत जमीनीच्या नुकसानीसाठी मदतीचे वाटप करतांना खालीलप्रमाणे दक्षता घेण्यात यावी :-

१) लाभार्थ्याने अन्य कोणत्याही शासकीय योजनेखाली मदत अथवा अर्थसहाय्य/अनुदान घेतलेले नसावे.

२) महसूल अभिलेखानुसार शेत जमीनींचे मालक असलेल्या फक्त अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना मदत अनुज्ञेय राहील.

३) प्रचलित पध्दतीनुसार कृषि सहाय्यक, तलाठी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने पूर्ण करण्यात आलेल्या पंचनाम्याबाबत शासनास सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार मदतीचे वाटप संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावे.

४) संबंधित बाधितांच्या बँक बचत खात्यात मदतीची रक्कम थेट जमा करण्यात यावी. कोणत्याही बाधितांना रोखीने किंवा निविष्ठा स्वरुपात मदत करण्यात येवू नये.

५) शेत जमीनीच्या झालेल्या नुकसानीकरीता मदतीची रक्कम खातेदारांच्या बँक खात्यावर थेट जमा करतांना मदतीच्या रक्कमेमधून कोणत्याही बँकेने कोणत्याही प्रकारची वसुली करु नये. याकरीता सहकार विभागाने योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

वरीलप्रमाणे देण्यात येणाऱ्या मदतीसाठी होणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक सी-६
२२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य,
०२, पूर, चक्रीवादळे इत्यादि.
१०१, अनुग्रह सहाय्य,
(९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च,
(९१) (०५) पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना सहाय्य,
३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ २४५२)

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०७०९१५१६४९१४१९** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.07.09 15:26:15 +05'30'

(सु. ह. उमराणीकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. विभागीय आयुक्त औरंगाबाद, औरंगाबाद
२. जिल्हाधिकारी लातूर, लातूर
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
४. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. जिल्हा कोषागारअधिकारी लातूर.
६. वित्तीय सल्लागार व सह सचिव (कार्यासन म-११), मदत व पूनर्वसन, मंत्रालय, मुंबई-३२ यांना निधी वितरित करण्याच्या विनंतीसह अग्रेषित
७. कार्यासन अधिकारी (म-११), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. निवड नस्ती (कार्यासन म-३)